Vol 6 Issue 10 April 2017

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 10 | APRIL - 2017

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

# महाराष्ट्राच्या राजकारणातील भारतीय जनता पक्षाच्या भूमिकेचा चिकीत्सक अभ्यास

प्रा. नारायण राजुरवार
राज्यशास्त्र विभाग, मु.सा.काकडे महाविद्यालय, सोमेश्वर नगर ता. बारामती.

## प्रस्तावना




भारतीय जनता पक्षचे अस्तित्व महाराष्ट्रात जनसंघाच्या काळापासून आहे. मात्र १९८० साली भाजपची स्थापना मुंबई या ठिकाणी झाल्यानंतर या पक्षाला महाराष्ट्रात पूर्वीपेक्षा अधिक जनाधार मिळत गेलेला दिसतो. महाराष्ट्रात १९५२ च्या निवडणूकीपासून जनसंघाचे अस्तित्व असले, तरी ते पूरत क्षीण होते. १९५२ च्या विधानसभा निवडणूकीत या पक्षाने २ जागा लढवल्या होत्या. मात्र १९६२ पासून जनता पक्षात विलीन होईपर्यंतच्या ३ निवडणूकांत जनसंघाने अनुक्रमे १२७, १६५ आणि १४२ एवढ्या जागा लढवल्या. मात्र या काळातही निवडून येणारे उमेद्वार हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच होते. हाच सिलसिला थोड्याफार फरकाने जनता पक्षाचा प्रयोग फसल्यानंतरच्या दोन निवडणूकांतही चालू राहिला. मात्र भाजपने शिवसेनेशी यूती केल्यानंतर या चित्रात मोठा फरक पडला. जनता पक्षाचा प्रयोग फसल्यानंतरच्या दोन निवडणूकांतही चालू राहिला. मात्र भाजपने शिवसेनेशी यूती केल्यानंतर या चित्रात मोठा फरक पडला आणि महाराष्ट्राच्या राजकारणात या पक्षाने आपले स्थान निश्चित केले. १९९० पासून ते २०१४ च्या विधानसभा निवडणूका आणि २०१७ च्या नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये मिळालेले अभूतपूर्व यश तसेच २०१४ लोकसभा निवडणूकीत नरेंद्र मोदी लाटेमुळे मिळालेल्या २४ जागा तसेच २०१४ नोव्हेंबर मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीमध्ये महाराष्ट्रात भाजपाने सर्वात जूना पक्ष असलेल्या शिवसेनेची यूती तोडून स्वबळावर विधानसभा निवडणूका जिंकल्या. या निवडणूकीत भाजपाला १२२ जागा मिळाल्या. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या मदतीने सरकार स्थापन केले.

महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रीयेत भाजपाची भूमिका अभ्यासताना मी प्रामुख्याने पूढील तीन प्रश्नाच्या आधारे भाजपाची भूमिका शोधणार आहे. मी माझ्या संशोधन लेखात प्रामुख्याने या तीन प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणार आहे.

१. भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्रातील राजकीय यश हे राष्ट्रीय पातळीवरील यशअपयशावर अवलंबून आहे का?

२. भारतीय जनता पक्षाला पंतप्रधान पदाचे लोकप्रिय उमेद्वार मिळाल्यानंतरच भाजपाला राष्ट्रीय आणि महाराष्ट्रात यश प्राप्त होते का?

३. हिंदूत्वाच्या राजकारणासोबतच विकासाच्या राजकारणाचा स्विकार केल्यामुळे देशात स्वबळावर व राज्यात शिवसेनेसोबत सरकार स्थापन करता आले का?

या तीन प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न मी या संशोधन लेखात करणार आहे.

१९८० साली अटल बिहारी वाजपेयीच्या अध्यक्षतेखाली मुंबईमध्ये भाजपची स्थापना झाली. जनसंघाचा पूनर्जन्म झाला असल्याची चर्चा तेव्हा झाली होती. भाजपचा १९८० ते १९९० हा दशकभराचा प्रवास या कयासापलिकडे झाला नाही. मात्र १९८६ नंतर रामजन्मभूमीचा वाद निर्माण झाला आणि भाजप चोहोबाजूने फैलाऊ लागला. या प्रक्रियेला महाराष्ट्रामधूनही पाठबळ मिळालेले दिसते. देशात ज्या राज्यामध्ये कॉंगेस बळकटपणे उभी होती त्यातील महाराष्ट्र एक राज्य होते. या राज्यात भाजपने अशी काही मुसंडी मारली की, राज्याच्या राजकारणाचे आधारच मोडून निघाले. भाजपने स्वतःच्या हिंदूत्वाचा अजेंडा अशा जोरकसपणे मांडला की, हिंदूत्वाशी देणेघेणे नसलेली शिवसेना पूरती भगवी होवून गेली. देशात उर्वरीत भागात डाव्या व मध्यमार्गी पक्षाचे राजकारण टिकून आहे. परंतु महाराष्ट्रात या शक्ती पूरत्या नेस्तनाबूत झालेल्या दिसतात. ज्या जनता पक्षात स्वतःचे अस्तीत्व जनसंघाने विलीन केले होते. तो जनता पक्ष (व नंतरचा जनता दल) आज महाराष्ट्रात नावापुरताही शिल्लक उरलेला नाही. विरोधी पक्षाची जागा अशा रितीने शिवसेनेच्या सोबतीने भाजपने मिळवलेली आहे. राष्ट्रीय पातळीवर ज्या दोन मुद्यांच्या आधारे भाजपने आपला विस्तार केला, त्या दोनही बाबींचे प्रयोग सर्वात प्रथम महाराष्ट्रात यशस्वी ठरले. नि मग ते राज्याराज्यात केले गेले. १९९८ च्या लोकसभा निवडणूकीत केंद्रात भाजपने स्वतःच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन केली. तोवर भाजप जवळपास एकाकी लढत होता. अपवाद फक्त दोन राज्यांचा. त्यातील एक राज्य होते पंजाब. जिथे अकाली दलासोबत यूती होती आणि दूसरे राज्य होते महाराष्ट्र. जिथे शिवसेनेशी यूती होती. पंजाबमधील यूतीला सामाजिक, भावनिक संदर्भ होता. हिंदू शिख ऐक्यातून कॉंग्रेसला पराभूत करता येईलच. शिवाय पंजाब प्रश्न सुटल्याचा मार्गही मोकळा होईल. अशी तेव्हाची भूमिका होती. शिवाय शिख हे हिंदूच आहेत. अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची जूनी धारण असल्याने या यूतीला भावनिक आधारही होता. महाराष्ट्रातील भाजप शिवसेना यूती मात्र सर्वस्वी राजकीय होती. कॉंग्रेसविरोधी मतांची बेरीज आणि हिंदूत्वाचे जहाल राजकारण हे या यूतीचे आधार होते. १९१८ मध्ये 'रालोआ' आघाडी स्थापन होईपर्यंत या

दोन्ही मूद्यांचा प्रयोग महाराष्ट्रात यशस्वी ठरल्याचा भाजपचा अनुभव होता. राज्याराज्यांत अनेक पक्षाशी यूती करण्यासंबंधी विचार करताना महाराष्ट्रातील प्रयोगाची शिदोरी त्यांच्या कामी आलेली दिसते. दुसरीकडे इतर राज्यातील पक्षासोबतच्या यूतीचा आधार हिंदूत्व हा नसला तरी १९८९ ते १९९८ या दशकभराच्या काळात भाजपने आपले हिंदूत्वाचे राजकारण सर्वत्र रेटलं. ते महाराष्ट्राच्या यशानंतर. असं यश महाराष्ट्र वगळता फक्त मध्यप्रदेश व उत्तरप्रदेशात मिळालं होतं या अर्थाने भाजपच्या राष्ट्रीय पातळीवरील विस्तारात रननिती व विचारधारा या दोन्ही बाबतीत महाराष्ट्राचं ठळक योगदान दिसू शकलं.

याशिवाय सामाजिक अभियांत्रीकीचा भाजपतर्फे महाराष्ट्रात झालेला प्रयोगही पक्षाला राष्ट्रीय पातळीवर पथदर्शक ठरलेला असू शकतो. भाजप हा 'शेटजी भटजींचा' पक्ष म्हणून ओळखला जात असे. शहरी-पांढरपेशे व उच्चवर्णीय एवढ्याच जनाधारामूळे पक्षाची वाढ खूंटलेली दिसून येत होती. मात्र महाराष्ट्रात ग्रामीण, मध्यमजातीतील बहूजन व आदिवासी अशा समाजघटकांना पक्षात आवर्जुन आणलं गेलं व महत्त्वाचे स्थान दिले गेले. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम झाला व पक्षाचा पाया विस्तारला. पक्षाची ताकद वाढली, उमेदवार निवडून येण्याचं पमाण वाढलं हा अनूभव लक्षात घेता पक्षाने अन्य राज्यातही हाच प्रयोग केला. जिथे-जिथे सामाजिक अभियांत्रिकीय प्रयोग मोकळेपणाने केला गेला, तिथे-तिथे जातीघटकातील नव नेतृत्व उदयास आले आणि पक्षविस्तार झाला. या पक्षविस्ताराला महाराष्ट्र भाजपचे महत्त्वाचे योगदान आहे असे म्हणता येते. १९९६, १९९८, १९९९, २०१४ या सर्व लोकसभा निवडणूकीमध्ये अनूक्रमे भाजपाला १६०, १८०, १८४, २८४ अशा जागा प्राप्त झाल्या. याच काळात महाराष्ट्रातही शिवसेनेसोबत भाजपाला चांगले यश मिळाले. महाराष्ट्रात १९९५ ते १९९९ या काळात यूतीचे सरकार स्थापन केले गेले होते. भाजपकडे उपमुख्यमंत्रीपद होते. १९९९ ची निवडणूक अपवाद ठरली. लाकसभेत भाजपाला यश मिळाले मात्र महाराष्ट्रात भाजपाला यश प्राप्त करता आले नाही.

यूतीचे सरकार जाण्यामागे प्रामुख्याने अण्णा हजारे यांनी यूतीच्या मंत्र्यांवर केलेले भ्रष्टाचाराचे आरोप यामध्ये शोभा फडणवीस, शशीकांत सूता, सुरेशदादा जैन या मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप करून शासनाची प्रतीमा जनमाणसांत मलीन झाली. तसेच 'रमेश किणी' प्रकरणामुळे, रमाबाई आंबेडकर दंगल अशा घटनांमुळे सरकार पून्हा सत्तेत आले नाही. मात्र महाराष्ट्रात ज्या-ज्यावेळी देशपातळीवर भाजपाला यश मिळते, त्यावेळेस राज्यातही यश प्राप्त झालेले दिसून येते.

२०१४ च्या लोकसभा निवडणूकीत राष्ट्रीय पातळीवर भाजपाला यश मिळाले. महाराष्ट्रातही २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत भजपला १२२ जागा मिळाल्या आणि भाजपाला महाराष्ट्रात शिवसेनेसोबत सत्ता स्थापन करता आली.

भारतीय जनता पक्षाच्या देशपातळीवरील व राज्य पातळीवरील यशस्वी कामगिरीचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते, भाजपाचे यश हे केंद्रीय नेतृत्वाच्या, पंतप्रधानाच्या व्यक्तिमत्वावरील यश असते. ज्या-ज्या वेळेस पंतप्रधान पदाचे उमेद्वार लोकप्रीय असतात त्यावेळेस भाजपाला नेत्रदीपक यश मिळाले आहे. १९९६, १९९८, १९९९, २०१४ या निवडणकीत अनूक्रमे श्री अटलबिहारी वाजपेयी, श्री नरेंद्र मोदी यांच्यामूळे भाजपला राष्ट्रीय पातळीवर व राज्यपातळीवर राजकीय प्रक्रीयेत महत्त्वाची भूमिका पार पाडता आली.

महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रीयेचा विचार केला तर महाराष्ट्र हे राज्य पारंपारिकदृष्ट्याा कॉंग्रेसचा बालेकिल्ला असलेला दिसून येते. महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, स्थानिक स्वराज्य शासन संस्था यांच्यावरती कॉंग्रेस पक्षाचे नियंत्रण असल्यामुळे कॉंग्रेसला महाराष्ट्रात पराभूत करणे भाजपाला अवघड जाते. १९९५ आणि २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत राष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणाचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला दिसतो.

१९९५ च्या विधानसभा निवडणूकीत भाजपा सेनेला यश मिळाले मात्र त्यावेळेस मुख्यमंत्री पद हे सेनेकडे होते. तसेच उपमुख्यमंत्रीपद हे भाजपाकडे होते. २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत भाजपाने शिवसेने सोबतची (१९८९ पासूनची) यूती तोडून स्वबळावर निवडणूका लढवल्या. या निवडणूकीत भाजपाला १२२ जागा मिळाल्या व या पक्षाचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस झाले. देवेंद्रजी यांच्या स्वच्छ प्रतीभेमुळे भाजपाला नूकत्याच (२०१४) च्या शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य शासन संस्थाच्या निवडणूकीत अभूतपूर्व यश मिळाले.

संपूर्ण महाराष्ट्रात विदर्भ, कोकण, प. महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रामध्ये भाजपाला यश मिळाले. भाजपाला महाराष्ट्रातील सर्व समाजातील जनतेचा पाठिंबा मिळताना दिसतो. कारण भाजपाने हिंदूत्वाचा मुद्दा बाजूला सारून विकासाच्या मुद्यावर निवडणूका लढवल्यामुळे भाजपाला समाजातील इतर मागास वर्ग, उच्च जाती, काही प्रमाणात अनुसूचीत जाती, जमाती व थोड्या प्रमाणात अल्पसंख्यांकांचा पाठिंबा मिळताना दिसतो.

वर्तमान परिस्थितीत महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेतील भाजपा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. भाजपा शिवाय महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेचा अभ्यास पूर्ण होवू शकत नाही. महाराष्ट्राच्या राजकारणाचे सर्व संदर्भ बदलण्याचे कार्य भाजपा करता दिसून येतो.

महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या आरक्षणावरून जे लाखो जनसमुदायाचे मोर्चे निघाले, त्यावेळेस असे वातावरण तयार झाले होते की, महाराष्ट्रात पुन्हा बिजेपी सरकार सत्तेवर येवू शकत नाही. परंतू भाजपाने हा प्रश्न यशस्वीपणे हाताळून मराठा समाजाचा रोष कमी करण्याचा प्रयत्न केला व त्याचा चांगला परिणाम स्थानीक स्वराज्य शासन संस्थाच्या निकालावरून लक्षात येतो. वर्तमान परिस्थितीत शेतकऱ्यांचे कर्ज माफी हा मुद्दा सोडला तर सरकार समोर कोणतेही मोठे आव्हान नाही. भाजपा हा शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा प्रश्न, शेतकऱ्याच्या मालाला योग्य हमीभाव, धनगर आरक्षणाचा प्रश्न, मराठा आरक्षणाचा प्रश्न कश्या पद्धतीने हाताळतो त्यावर या पक्षाचे महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रीयेतील यश अवलंबून असणार आहे. आजच्या परिस्थितीत महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेतील भाजपा हा महत्त्वाचा घटक आहे.

## संदर्भ सूची

१. कुलकर्णी सुहास, १९९१, मंडल आयोग व महाराष्ट्रातील तिकीट वाटप, समाज प्रबोधन पत्रिका.
२. पळशीकर सुहास, नितिन बिरमल, २००४, महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन.
३. व्होरा राजेंद्र, सुहास पळशीकर, १९९६, महाराष्ट्रातील सत्तांतर, ग्रंथाली प्रकाशन.
४. सुहास पळशीकर, २००७, सत्तासंघर्ष, समकालीन प्रकाशन.
५. सुहास पळशीकर, २००६, भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण, साधना प्रकाशन.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org